॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grad

Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/४१८ दिनांक १८/१०/२०२३

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी खालील संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: महाराष्ट्रातील पोलीस ठाण्यांमध्ये "पोलीस अनुभवात्मक प्रशिक्षण" **(ELP)** कार्यक्रमामध्ये रा.से.यो. स्वंयसेवकांच्या सहभागा बाबत.

संदर्भ: डॉ. रामेश्वर कोठावळे, मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई यांचे जा.क्र. रासेयो–२०२३/प्र.क्र.२०४/साशि–७ दिनांक १६ ऑक्टोबर २०२३

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र पोलीस विभागाच्या सहकार्याने रा.से.यो. स्वंयसेवकासाठी **Yuva Portal https://yuva.gov.in** द्वारे विद्यार्थी पोलीस अनुभवात्मक प्रशिक्षण सुरू करण्यात येणार आहे. महाराष्ट्र पोलीस विभागाच्यावतीने सर्व जिल्हयातील पोलीस स्टेशनचा यामध्ये समावेश केला आहे. याबाबत विद्यार्थ्यांना पोलीस अनुभवात्मक शिक्षणाच्या संधी युवा पोर्टल पाहता येतील. पोलीस अनुभवात्मक शिक्षणाची सुरूवात त्वरीत होणार असून या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी प्रथमत: कार्यक्रम अधिकारी यांची नोंदणी अनिवार्यपणे करणे गरजेचे आहे. तसेच रा.से.यो. स्वंयसेवकानी दिनांक १६ ऑक्टोबर २०२३ पासून **YUVA PORTAL** द्वारे ऑनलाईन नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. सदर पोलीस अनुभवात्मक प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सामाजिक कौशल्य, कायदेशीर नियम आणि नियमन, पोलीस तपास प्रक्रिया, कायदा सुव्यवस्था यांचा समावेश असणार आहे, जे स्वंयसेवक कौशल्य विकासासाठी पात्र ठरतील, त्यांना पोलीस अनुभवात्मक प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर **YUVA PORTAL** द्वारे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. रा.से.यो. स्वंयसेवकांना पोलीस विभागासोबत व पोलीस अधिका–यासोबत काम करण्याची अनोखी संधी उपलब्ध झाली आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त रा.से.यो. स्वंयसेकांना पोलीस अनुभवात्मक प्रशिक्षणाकरिता प्रोत्साहीत करण्यात यावे व त्या बाबतचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई–मेलवर पाठविण्यात यावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.